आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२० जानेवारी २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- दावोस आर्थिक परिषदेत पहिल्याच दिवशी महाराष्ट्राचे विविध कंपन्याबरोबर साडेचौदा लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार

- इलेक्ट्रॉनिक्स निर्यात क्षेत्रात भारत जगातला तिसरा सर्वात मोठा निर्यातदार देश

- भारतीय जनता पार्टीचे १२ वे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितिन नोबीन यांनी स्वीकारला पदभार

- मुंबई किनाऱ्याजवळ सीमाशुल्क विभागाच्या कारवाईत तस्करीचं १८० टन डिझेल जप्त

**आणि**

- बॅडमिंटनपटू सायना नेहवालची निवृत्तीची घोषणा

**<><><><><>**

स्वित्झर्लंडमध्ये दावोस इथं आयोजित जागतिक आर्थिक परिषदेत कालच्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्र राज्य सरकारनं विविध कंपन्याबरोबर विक्रमी साडेचौदा लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. याअंतर्गत स्वाक्षरी केलेल्या १९ सामंजस्य करारांमुळे विविध क्षेत्रांमध्ये १५ लाखांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होण्याचा अंदाज आहे. हे करार राज्याच्या विकसित महाराष्ट्र २०४७: व्हिजन आणि पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या महत्त्वाकांक्षी ध्येयाशी सुसंगत आहेत, असं राज्य सरकारच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. महाराष्ट्र भारतातली गुंतवणुकीसाठी सर्वात चांगली जागा असल्याचं मुख्यमंत्र्यांनी परिषदेत सांगितलं.

**- - - होल्ड - मुख्यमंत्री - बाईट - - -**

यावेळी राज्य शासनानं नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि. यांच्याबरोबर चार हजार कोटी रुपयांचा करार, लोढा डेव्हलपर्स लिमिटेड बरोबर एक लाख कोटी रुपयांचा करार, अन्न आणि कृषी क्षेत्रात कार्ल्सबर्ग यांच्याबरोबर ५०० कोटी रुपयांचा करार, विदर्भामधे पोलाद क्षेत्रात सुरजागड इस्पात लिमिटेडबरोबर २० हजार कोटी रुपयांचा

करार, तर लॉजिस्टिक्स क्षेत्रात एमएमआरडीए आणि एसबीजी ग्रुप यांच्यात २० अब्ज डॉलर्सचा करार करण्यात आला.

आगामी दोन दिवसात दावोसमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कंम्प्युटींग, डीजिटल सोयीसुविधा, फिनटेक, लॉजिस्टिक्स अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर तसंच जहाज बांधणी, ईव्ही, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील आणखी काही उद्योग घटकांशीही गुंतवणुकीचे सामंजस्य करार होणार आहेत. त्यादृष्टीने त्यांच्या प्रतिनिधींशी, चर्चेच्या फेऱ्या सुरू आहेत.

<><><><><>

भारतानं २०२५ मधे ४७ अब्ज डॉलर्स म्हणजेच चार लाख १५ हजार कोटी रुपयांची विक्रमी इलेक्ट्रॉनिक्स निर्यात साध्य केली आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाजमाध्यमावरुन ही माहिती दिली. पीएलआय आधारित योजनेतून उत्पादित स्मार्टफोन निर्यातीतून ३० अब्ज डॉलर्सची निर्यात करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०१५ पासून इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या निर्यातीत ११ पट वाढ झाली असून, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात आता भारत जगातला तिसरा सर्वात मोठा निर्यातदार देश आहे. इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या उत्पादनामुळे महिलांच्या मजबूत सहभागासह २५ लाख नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या असून एमएसएमईसाठी मोठ्या संधी आणि तरुणांना दीर्घकालीन कौशल्य उपलब्ध झाल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

<><><><><>

भारतीय जनता पक्षाचे बारावे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नवीन यांच्या नावाची औपचारिक घोषणा आज नवी दिल्लीच्या भाजप मुख्यालयात पक्षाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. के लक्ष्मण यांनी केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवीन यांचा सत्कार करण्यात आला. केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, नितीन गडकरी, माजी अध्यक्ष जे.पी नड्डा यावेळी उपस्थिते होते. नितीन नवीन हे बिहार विधानसभेवर पाच वेळा निवडून आले आहेत, तसंच बिहार सरकारमध्ये ते गृहनिर्माण आणि कायदा मंत्री होते. सिक्कीम आणि छत्तीसगड सारख्या राज्यांमध्येही त्यांनी महत्त्वाच्या संघटनात्मक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.

नितीन नबीन हे भाजपाचे आतापर्यंतचे सर्वात तरुण अध्यक्ष ठरले आहेत.

जगातल्या सर्वात मोठ्या राजकीय पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी नितीन नबीन यांचं अभिनंदन केलं. नितीन नबीन यांच्यावर केवळ पक्षाचीच नाही तर रालोआमधे समन्वय साधण्याची जबाबदारी आहे, असं मोदी म्हणाले.

- **- होल्ड बाईट मोदी** - - -

माजी राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनीही नबीन यांचं अभिनंदन केलं. नबीन यांच्या नेतृत्वात भाजपा प्रगती करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही नितीन नबीन यांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

भारत येत्या पंचवीस वर्षात विकसित देश बनण्याच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे आणि या प्रवासाच्या केंद्रस्थानी आरोग्यव्यस्था असेल असं प्रतिपादन केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब-कल्याण मंत्री अनुप्रिया पटेल यांनी आज केलं. पुद्दुचेरी इथं जवाहरलाल पदव्युत्तर वैद्यकिय शिक्षण संस्थेंच्या चौदाव्या पदवीदान समारंभात त्या संबोधित करत होत्या. राष्ट्रीय आरोग्य योजनेमुळे रुग्णाची काळजी घेणे ते प्रतिबंधात्मक, प्रोत्सहनात्मक, पुनर्वसन ते उपशामक अशा सर्व उपचारप्रकारांशी संबधित धोरणांमध्ये आमूलाग्र बदल होईल असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

८३ देशांचे राजदूत आणि उच्चायुक्तांसोबत मत्स्य व्यवसाय विभाग उद्या नवी दिल्ली इथं गोलमेज परिषद आयोजित करणार आहे. मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह या परिषदेचं अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. द्विपक्षीय व्यापार वाढवणं, समुद्री खाद्य निर्यात वाढवणं हे याचं उद्दिष्ट आहे. आशिया, आफ्रिका, युरोप, उत्तर अमेरिका, ओशेनिया, लॅटिन अमेरिका आणि कॅरेबियन देशांमधले प्रतिनिधी या परिषदेत सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

मुंबई सीमा शुल्क विभागानं समुद्रातच एका मालवाहू नौकेला अडवून त्यातून अवैधरित्या नेण्यात येत असलेलं १८० टनाहून जास्त हाय स्पीड डिझल जप्त केलं. हे डिझल जहाजवरच्या पाण्याच्या टाक्यांमध्ये लपवलेलं होतं. या प्रकरणात नौकेचा कप्तान

आणि मालकाच्या मुलाला अटक करण्यात आलं आहे. गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत सीमा शुल्क विभागानं एम व्ही टीना या नौकेवर छापा टाकला होता.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात होणारे वाढवण आणि जिंदाल बंदर रद्द करावे, प्रलंबित वनपट्टे धारकाच्या नावावर करावेत, स्मार्ट मीटरची सक्ती बंद करावी, अशा विविध १२ मागण्यांसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि किसान मोर्चाने काढलेला लाँग मार्च आज मनोर इथं पोहचला आहे. मनोर इथून हा मोर्चा संध्याकाळपर्यंत पालघरला पोहचणार असून, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. डहाणूचे आमदार विनोद निकोले, आणि किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक ढवळे हे या मोर्चाचे नेतृत्व करत आहेत.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यातल्या डोंगरी बुजरुक इथं मँगनीज खाणीत कामगारांनी कामबंद आंदोलन पुकारलं आहे. कामगार पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांने अनेक कामगारांना कामावरुन कमी केलं, तसंच कामगारांचा पगार देखील कमी केल्याने हे आंदोलन करण्यात येत आहे. कामगारांच्या मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरुच ठेवण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

**<><><><><>**

कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणातला प्रमुख आरोपी समीर गायकवाड याचा आज पहाटे सांगली इथं मृत्यू झाला. पानसरे हत्या प्रकरणी हत्येचा कट रचल्याचा आरोप त्याच्यावर होता. २०१७ मधे तो जामीनावर सुटला होता. समीर गायकवाडसह १२ आरोपी होते. त्यातल्या ९ जणांना अटक झाली होती, आणि ४ पुरवणी आरोपपत्रं दाखल करण्यात आली होती.

**<><><><><>**

ऑलिंपिक पदक विजेती सायना नेहवालने बॅडमिंटनमधून निवृत्ती जाहीर केली आहे. गुडघ्याच्या दुखापतीमुळे गेली दोन वर्ष सायना खेळापासून दूर होती. मात्र आता दुखणं बळावल्यामुळे आपण खेळणं थांबवत असल्याचं तिने एका पॉडकास्टच्या माध्यमातून

जाहीर केलं. जागतिक क्रमवारीत अव्वलस्थान मिळवणारी ऑलिंपिक पदक जिंकणारी ती पहिली महिला भारतीय बॅडमिंटनपटू आहे.

२०१६ मधे रियो द जानिरो ऑलिंपिकच्या वेळी गुडघ्याला दुखापत झाल्यानंतरही २०१७च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत तिने कांस्यपदक आणि २०१८च्या राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलं होतं.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड क्रिकेटसंघांच्या टी ट्वेंटी सामन्यांच्या मालिकेला उद्यापासून प्रारंभ होत आहे. मालिका ५ सामन्यांची असून  पहिला सामना नागपूरच्या जामठा स्टेडीयमवर होणार आहे.

**//<><><><><>//**